# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- १६/०९/२०१८

**मालेगाव शहरातील मोबाईल दुकाने फोडणारे सराईत गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने केले जेरबंद**

---

मालेगाव शहरात गेल्या हप्त्यात बुधवारी रात्रीचे सुमारास नयापुरा येथील रहिवासी श्री. शेख फैजान निसार अहमद यांचे भंगार बाजार परिसरातील जावेद टुल्स मोबाईल शॉप फोडुन कोणीतरी अज्ञात चोरीटयांनी शॉपमध्ये विक्रीस व दुरूस्तीस असलेले विविध कंपन्यांचे मोबाईल फोन घरफोडी चोरी करून नेले होते. सदर बाबत मालेगाव शहर पोलीस ठाणेस I गुन्हा रजि.नं. ४३/२०१८ भादवि कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. मालेगाव शहरातील मोबाईल दुकानांमध्ये होणारे चोरीचे गुन्हयांचा स्थानिक गुन्हे शाखेचे पथकामार्फत समांतर तपास सुरू होता.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. निलोत्पल सो** यांनी मालेगाव शहरातील वाढते घरफोडी, चोरीचे गुन्हे तसेच मोबाईल दुकानांमध्ये होणारे चोरीचे गुन्हयांचा सविस्तर आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन व सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी मालेगाव शहर तसेच शहरालगतचे तालुक्यांमधील मोबाईल दुकाने फोडणारे गुन्हेगारांची गुन्हा करण्याचे पध्दतीवरून मिळविलेल्या गुप्त माहितीचे आधारे सदर गुन्हयांमधील चोरीस गेलेले मोबाईल हे मालेगाव शहरातील काही इसम कमी किंमतीचे भावात मालेगाव शहरात विक्री करत असले बाबत समजले. त्याप्रमाणे दिनांक १५/०९/२०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी हे मालेगाव शहरातील खड्डाजिन परिसरात गस्त घातल असतांना मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे इसम नामे **१) मोहमद मेहमुद अब्दुल रशिद अन्सारी, वय १९, रा. कमालपुरा, मालेगाव** यास शिताफिने ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात तसेच त्याचे हातातील पिशवीमध्ये **सॅमसंग, एम.आय, लिनोव्हो, ब्लॅकबेरी, कार्बन, मायक्रोमॅक्स, इंटेक्स** अशा विविध कंपन्यांचे **एकुण ५४ मोबाईल हॅण्डसेट** हस्तगत करण्यात करण्यात आले. सदर मोबाईल बाबत त्यास विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने त्याचा भाउ नामे **२) मुस्तफा अब्दुल रशिद अन्सारी उर्फ मुस्तफा चोरवा,** रा. कमालपुरा, मालेगाव याचेसह गेल्या हप्त्यात मालेगाव शहरातील भंगार बाजार परिसरातील मोबाईल शॉप फोडले असल्याची कबुली दिली आहे. ताब्यात घेतलेले आरोपीने कबुली दिलेवरून मालेगाव शहर पोलीस ठाणेस दाखल असलेला I गुन्हा रजि.नं. ४३/२०१८ भादवि कलम ४५४, ४५७, ३८० हा गुन्हा उघडकीस आलेला असुन सदर आरोपीचा भाउ मुस्तफा चोरवा याचा स्थागुशाचे पथक शोध घेत आहे. सदर दोन्ही आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांचेकडुन घरफोडीचे अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. निलोत्पल सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, सपोनि संदिप दुनगहू,** सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा राजु मोरे, वसंत महाले, सुहास छत्रे, सुनिल पानसरे, पोना राकेश उबाळे, देवा गोविंद, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ यांचे पथकाने सदर कामगिरी केली आहे.